# जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांचे कार्यालय, रत्नागिरी

## (नगरपालिका प्रशासन शाखा)

**दुरध्वनी क्र. 02352-222483 फॅक्स- 02352-226250 E-mail- dpoduda.ratnagiri@gmail.com**

क्रमांक:नपाप्र-5/कावि-528/2019 दिनांक:- 23/07/2019

प्रति,

श्री. नरेंद्र दगडू शिगवण,
मु.पो. मुरडे,
ता. खेड जि. रत्नागिरी

विषय:- रत्नागिरी 24×7 तक्रार निवारण कक्षातील तक्रार.

संदर्भ:-1) आपली दि. 04/06/2019 रोजी रत्नागिरी 24 × 7 तक्रार निवारण कक्षास प्राप्त झालेली तक्रार.

उक्त विषयाबाबत संदर्भाकित पत्राला अनुसरुन कळविण्यात येते की, आपण या कार्यालयाकडे दाखल केलेल्या तक्रारीवरती मुख्याधिकारी, नगरपरिषद खेड यांचेकडून या कार्यालयास प्राप्त झालेल्या अहवालावरुन आपणास असे कळविण्यात येते की, आपण मुख्याधिकारी नगरपरिषद यांचेकडे यापुर्वी देखिल सदर विषयाबाबत दाखल केलेल्या तक्रारी वरती मुख्याधिकारी नगरपरिषद खेड यांनी दखल घेवून आपणास अपेक्षित असलेली सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती देण्यात आलेल्या आहेत.

मुख्याधिकारी, नगरपरिषद खेड यांचेकडून या कार्यालयास प्राप्त झालेल्या दि. 23/07/2019 रोजीच्या अहवालाची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे.

सबब आपला सदरचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(शिल्पा नाईक)
**जिल्हा प्रशासन अधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी**

प्रत:- पर्यवेक्षक, रत्नागिरी 24×7 तक्रार निवारण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांजकडे माहितीसाठी.

# खेड नगरपरिषद खेड,जि.रत्नागिरी

(तीनबत्ती नाका, मु.पो.ता.खेड, जि.रत्नागिरी)

फोन नंबर -०२३५६/२६३०२४ फॅक्स नं.-०२३५६/२६३०८० ई-मेल-khednp1940@gmail.com


जावक क्र./१४३७/सन २०१९-२० दिनांक - २३/०७/२०१९

प्रति,

मा. जिल्हाधिकारी साहेब

रत्नागिरी जि. रत्नागिरी

**विषय** :: खांबतलावाच्या ई-निविदा संबंधीत छाननी करतेवेळी मुख्याधिकारी यांनी भ्रष्टमार्गाने निविदा मंजूरकेल्याचे दिसून येत असून त्याची चौकशी करून कारवाई करणे व झालेल्या कामाची तपासणी करणेबाबत.

**संदर्भ** ::- जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी क्रमांकःनपाप्र-५/कावि-३६१/२०१९ दिनांक- १३/०६/२०१९

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविणेत येते की, न.प खांबतळ्याचे सुशोभिकरण कामाचे ई निविदा संदर्भात तक्रारदार श्री. नरेंद्र शिगवण यांनी नगरपरिषदेकडे यापूर्वी पासून तक्रारी अर्ज सादर केलेले आहे. नगरपरिषदेकडे त्यांनी सादर केलेल्या अर्जाची योग्य ती दखल घेवुन त्यांना अपेक्षित असलेली सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती यापुर्वीच देणेत आलेल्या आहेत. व खांबतळ्याचे सुशोभिकरण कामाचे ई निविदां कामाबाबत न.प. जा.क्र. ८३३ दिनांक १७/०७/२०१७ रोजीच्या पत्रांन्वये त्यांना माहिती देणेत आलेली आहे. तसेच सदर प्रकरणी श्री. नरेंद्र द. शिगवण यांनी आपले कार्यालयाकडे निवारण कक्ष २४ x ७ वर व नगरपरिषदेकडे तक्रारी अर्ज सादर केलेली आहेत. त्यांचे प्राप्त सर्व तक्रारी अर्जांना न.प.जा.क्र. २०३१ दि. ५/१२/२०१७, २०७७ दि. १२/१२/२०१७, २८८६ दि. २७/०२/२०१८, २५३ दि २७/०४/२०१८ रोजीने ई-निविदा संदर्भाची परीपूर्ण कागदपत्रे व अहवाल त्यांना देणेत आलेला आहे. व या ई-निविदा संदर्भात आपणाकडे यापूर्वीच अहवाल सादर करणेत आलेला आहे.

५२८
२३.७.१९

नगरपरिषदेच्या खांबतळयाचे सुशोभिकरण करणेच्या कामाच्या निविदेच्या छाननीबाबत मुख्याधिकारी यांनी भ्रष्टमार्गाने निविदा मंजूरकेल्याचे दिसून येत असून त्याची चौकशी करून कारवाई करणे व झालेल्या कामाची तपासणी करणेबाबत श्री. नरेंद्र द. शिगवण यांनी तक्रारी अर्ज सादर केलेला आहे. परंतु या कामाची निविदा करणेत आली. त्याबाबतची सर्व कागदपत्रांची झेरॉक्स प्रत नरेंद्र शिगवण यांना या कार्यालयाकडून देणेत आलेली आहेत. व सदर कामाची निविदा करताना मुख्याधिकारी यांनी भ्रष्टमार्गाने निविदा मंजूर करणेत आलेली आहे. असे म्हणणे खोटे आहे. कारण सदर कामाची प्राप्त निविदेस नगरपरिषदेच्या सभागृहाची मान्यता घेणेत आलेली आहे. त्यामुळे सदर कामाची प्राप्त निविदा नियमाप्रमाणेच छाननी करून मंजूर करेणेत आलेली आहे.

तरी श्री. नरेंद्र शिगवण यांनी आपणाकडे सादर केलेली निवारण कक्ष २४ x ७ वरील ई-निविदा संबंधीत छाननी करतेवेळी मुख्याधिकारी यांनी भ्रष्टमार्गाने निविदा मंजूरकेल्याचे दिसून येत असून त्याची चौकशी करून कारवाई करणे व झालेल्या कामाची तपासणी करणेबाबत.

ही तक्रार चुकीची असून त्यांनी केलेल्या तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य आढळुन येत नाही. त्यामुळे श्री. नरेंद्र दगडू शिगवण यांची तक्रार फेटाळणेत यावी ही नम्र विनंती.

KHED MUNICIPAL COUNCIL
खेड नगरपरिषद जि. रत्ना.
KHED, DIST. RATNAGIRI

आपला विश्वासू

मुख्याधिकारी
खेड नगरपरिषद,खेड